MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –११९ | मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -119 | TUESDAY DT.14 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## नवोदय विद्यालयाची गुणवत्ता सुधारा अन्यथा आंदोलन करू - प्रा.ईश्वर मुंडे

धारूर / प्रतिनिधि

देशातील गुणवंत विद्यार्थ्यांची परिक्षा घेऊन अती उच्च गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्यातील नवोदय विद्यालयात प्रवेश देवून ईयत्ता बारावी पर्यंत दर्जेदार शिक्षण देणे अशी केंद्र सरकारची गुणवंत विद्यार्थ्यांसाठी योजना आहे.बीड जिल्ह्यातील अती उच्च गुणवंत विद्यार्थ्यांना नवोदय विद्यालय,गढी ता.गेवराई येथील या केंद्रीय विद्यालयात प्रवेश दिला जातो. या साठी विद्यार्थी व पालक खूप परिश्रम घेतात.या विद्यालयात प्रवेश मिळाल्यानंतर आपल्या पाल्यांचे उज्वल भविष्य घडेल अशी पालकांची व विद्यार्थ्यांची अपेक्षा असते.परंतू नवोदय विद्यालय गढी येथे अनेक प्रशासकीय समस्या निर्माण झालेल्या असून तेथील गुणवत्ता घसरलेली आहे. या मुळे तेथील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय झालेले आहे. नवोदय विद्यालय,गढी येथील प्राचार्य व अध्यापकांची पदे रिक्त आहेत,कार्यरत अध्यापक व कर्मचारी यांच्या बेशिस्त वर्तनाचा विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होत आहे,कर्मचाऱ्यांचे विद्यार्थ्यांवर नियंत्रण नसल्यामुळे विद्यार्थी गैर वर्तन करीत आहेत,विद्यार्थी व अध्यापक यांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा अभाव आहे,मेस मध्ये दर्जेदार जेवन मिळत नाही.अशा समस्यांमुळे नवोदय विद्यालय,गढी येथील गुणवत्तेचा दर्जा घसरलेला आहे. मा.जिल्हाधिकारी हे या विद्यालय समितीचे अध्यक्ष आसतात.अध्यक्ष या नेत्याने आपण दि.१६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत वरील सर्व समस्या सोडवून विद्यालयाची गुणवत्ता सुधारणा करावी.

# वाल्मिक कराडला मकोका, आक्रमक समर्थकांकडून परळी बंदची हाक

## टायर पेटवल्या, बाजारपेठ बंद केली

बीड : खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मिक कराडवर मकोका लावल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी परळी बंदची हाक दिली आहे. परळी शहरात सध्या कडकडीत बंद झाली असून कराडच्या समर्थकांनी रस्त्यांवर टायर पेटवून या गोष्टीचा निषेध केला. वाल्मिक कराडवर पवनचक्की कंपनीकडून दोन कोटींची खंडणी मागितल्याचा आरोप आहे. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या मुळाशी हेच खंडणी प्रकरण असल्याचा संशय पोलिसांना आहे.

आज मकरसंक्रांत असल्याने बाजारपेठ गर्दीने सजली होती. मात्र वाल्मिक कराडवर मकोका लावल्यानंतर परळी बंदची हाक समर्थकांनी दिली. त्यामध्ये मुख्य बाजारपेठ मोंढा, टावर, बाजार समिती रोड, बस स्टँड रोड सगळं बंद झालं.

**वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई**

संतोष देशमुख हत्याप्रकरणी अखेर वाल्मिक कराडवर मकोकातंर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाल्मिक कराडवर मकोका लावावा अशी देशमुख कुटुंबीयांसह सर्वपक्षीय नेत्यांची मागणी होती. याआधी वाल्मिक कराड हा खंडणी प्रकरणात पोलिसांना शरण गेला होता. मात्र त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी होती. त्यासाठी देशमुख कुटुंबानं सोमवारी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन देखील केलं होतं.




या आधी संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर या प्रकरणातील सात आरोपींवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलं होतं. आता वाल्मिक कराडलाही या कायद्याच्या अंतर्गत आणण्यात आलं आहे.

**हत्येत अजून कुणी सामील असल्यास कारवाई करावी**

वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई सुरू केल्यानंतर संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांनी त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणात अजून कुणाचा समावेश असल्याच त्याच्यावरही कारवाई करण्यात यावी अशी मागणी संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुखने केली आहे.

**वाल्मिक कराडच्या आईचा ठिय्या**

पवनचक्की खंडणी प्रकरणात मुख्य आरोपी असलेल्या वाल्मिक कराडला सोडण्यात यावं, त्याला जातीय राजकारणाचा बळी केला जातोय असा आरोप करत वाल्मिक कराडच्या आईने आणि पत्नीने परळी पोलिस स्टेशनसमोर ठिय्या मांडला होता. आता वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर त्याच्या पत्नीने निषेध व्यक्त केला आहे.

दरम्यान, संतोष देशमुखांच्या हत्येचा तपास करण्यासाठी नवीन एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. त्यामध्ये वाल्मिक कराडशी संपर्कात असलेल्या अधिकाऱ्यांना वगळण्यात आलं आहे.

## सोलापूर येथे हिमोफिलिया रुग्णांसाठी मोफत फॅक्टर डिस्ट्रीब्युशन, सेल्फ इन्फ्युजन आणि फिजिओथेरपी कॅम्पचे आयोजन

दिनांक १२ जानेवारी २०२५, रविवार रोजी, श्रीमती गोपाबाई दमानी ब्लड सेंटर, सोलापूर येथे इंटास फाउंडेशन आणि लक्ष्मी हिमोफिलिया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हिमोफिलिया पेशंट असिस्टंट प्रोग्राम अंतर्गत फॅक्टर डिस्ट्रीब्युशन, सेल्फ इन्फ्युजन आणि फिजिओथेरपी कॅम्प आयोजित करण्यात आला.

सोलापूर सरकारी रुग्णालयात फॅक्टर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेक रुग्णांना उपचारांसाठी इतर शहरांकडे जावे लागते, विशेषतः १०वी आणि १२वी बोर्ड परीक्षांच्या काळात. या अडचणींचा विचार करून रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या विनंतीवरून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कॅम्पचा लाभ सुमारे ७५ रुग्णांना फॅक्टर ८ मिळवून देण्यात आला. इंटास फाउंडेशनने मोफत फॅक्टर ८ वाटप केले आणि या उपक्रमाने रुग्णांना महत्त्वाचा दिलासा दिला.

सुमन कोकडे यांनी सेल्फ इन्फ्युजन सेशनद्वारे फॅक्टरचे महत्त्व रुग्णांना समजावून दिले. तसेच, डॉ. अनिश आंगल यांनी फिजिओथेरपीचे महत्त्व समजावून सांगत प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे रुग्णांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमात इंटास फाउंडेशनचे प्रकल्प समन्वयक श्री. सुरज माळी, प्राविणा गेडम, भक्ति केळगणे, सोलापूरचे हेमॅटोलॉजिस्ट डॉ. संतोष




खूबा, तसेच लक्ष्मी हिमोफिलिया फाउंडेशनचे सचिव श्री. अनिल साळुंके आणि कु. लक्ष्मी साळुंके उपस्थित होते. याशिवाय कु. वैष्णवी महानुर, कु. श्रुती कात्रट, कु. समीक्षा जाधव, कु. आदिती गायकवाड आणि कु. खुशी कोळी यांचाही सक्रिय सहभाग होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. रुचा साळुंके यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. नंदिनी गरड यांनी केले.रुग्ण आणि नातेवाईकांनी इंटास फाउंडेशनचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आणि सोलापूरमध्ये असे उपक्रम अधिक वेळा आयोजित करण्याची विनंती केली.हा उपक्रम सोलापूरमधील हिमोफिलिया रुग्णांसाठी एक महत्त्वपूर्ण मदत ठरला असून, यामुळे रुग्णांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होऊन त्यांच्या आरोग्यात सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे.

## टाकरवन ते टाकरवन फाटा रस्त्याची आतिशय दैनिय आवस्था

टाकरवन ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील टाकरवण येथील रस्त्यावर खड्डेच खड्डे टाकरवन ते टाकरवन फाटा रस्त्याची आतिशय दैनिय आवस्था बनल्याने. या मार्गावरुन वाहन चालवने कठीन बनले. लहामोठे आपघात वाढल्याने नागरीकांचे प्रचंड हाल होत आहेत.स वैजिक बांधकाम विभागने लक्ष देन्याची मागनी होत आहे.

आठवडी बाजार अन मोठी बाजारपेठ असलेले टाकरवन हे सर्कल चे मोठे व आहे. माञ टाकरवनसह परिसरातल्या पंचेवीस खेडेगावांना दळगावळनाचा मुख्य मार्ग आसलेल्या टाकरवन ते टाकरवन फाटा या पाच कि. मी. अतंर रत्याची आतिशय दैनिय अवस्था बनली आहे. रस्त्यावर मोठ मोठे खड्ये पडले आहेत. तसेच अनेक ठिकानी रत्यावर डांबरच राहीले नसल्याने. मोठे हाल सहन करावे लागत आहेत.लहानमोठे अपघाताची मालिका



सुरुच आहे. गावातुन शहरात आनी २२२ महामार्गाशी या महामार्गाशी जोडनारा हा रस्ता खड्डूयेमय बनल्याने. प्रवाशी वहान चालक रुग्णाना नरक यातना सहन कराव्या लागतात. विशेष पाच वर्षापुर्वीच या रस्त्याचे काम झाले होते.

माञ बोगस कामामुळे रस्ता वाहतुकीची समस्या गंभीर

टाकरवन सह परीसर ऊजवा कालवा गोवावरीमुळे पाणीदार आहे. शेतकरी ऊसाचे उत्पन्न मोठ्या प्रमानावर घेतात. मात्र या मार्गावरुन ऊसाची वाहतुक करतांना चढउतार मार्गामुळे ऊस वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. अवैद्य वाळुची अवजड वाहतुकीने रस्ता उखडला आहे.

उदडला आहे. परिनामी नागरींकांचे मोठे हाल होत आहेत. लोकप्रत निधीनी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष घालुन रस्ता दुरुस्त

**रस्त्यावर उतरून आंदोलनाचा पावित्रा**

टाकरवनचा हा रस्ता प्रमुख रस्ता आहे. मात्र दुरअवस्थेमुळे मोठे हाल होतात. संबधीत प्रशासनाने तात्काळ दुरुस्ती करावी अन्यथा २६ जानेवरी रोजी रस्तावर उतरुन जन आंदोलन करण्याचा इशारा
वशिम पटेल, टाकरवन

करण्याची मागणी केली जात आहे. मागणी पूर्ण न झाल्यास टाकरवन येथील ग्रामस्थांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागच्या विरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## पैसे भरलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ सोलरपंप द्या अन्यथा

### वंचित बहुजन आघाडी शेतकऱ्यांसह अमरण उपोषण करेल. पप्पु गायकवाड

गेवराई ।प्रतिनिधी

मागील कित्येक महिनेयांपासून सोलरपंप मिळावेत म्हणून ऑनलाईन अर्ज करून पैसे भरले तरी देखील शेतकऱ्यांना सोलरपंप दिले जात नाहीत, अनेक शेतकऱ्यांच्या नावे आलेले सोलरपंप सबंधित कंपनीच्या एजंटने परस्पर ईतर शेतकऱ्यांसोबत अर्थीक तडजोड करून लाभार्थ्यांना वितरीत न करता दुसऱ्याच शेतकऱ्यांना दिले आहेत अशी तक्रार गेवराई तालुक्यातील शेकडो गावातील हजारो शेतकऱ्यांनी वंचीत बहुजन आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांच्याकडे तोंडी स्वरुपात केली आणि गरजवंत शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन नेहमीप्रमाणे शेतकऱ्यांच्या हितासाठी विद्युत महावितरण अभियंते यांची भेट घेऊन त्यांना रितसर निवेदन देऊन ज्या शेतकऱ्यांनी सोलरपंप मिळावेत म्हणून ऑनलाईन अर्ज दाखल करुन पैसे भरले त्या शेतकऱ्यांना



तात्काळ सोलरपंप वितरीत करण्यात यावेत अन्यथा हजारो शेतकऱ्यांना सोबत घेऊन महावितरण कार्यालयासमोर अमरण उपोषण करू असा ईशारा देण्यात आला.

सविस्तर वृत्त असे की मागील दोन ते तिन महिन्यांपूर्वी मागासवर्गीय, ईतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी सिध्दकला, रोटोमॅक्स, ईव्हीआय, जेके, मिरा, शक्ती, टाटा या सोलरपंप वितरीत करनाऱ्या कंपन्या निवडून पैसे भरले परंतु सबंधित कंपनीच्या एजंट व डिस्टीब्युटर यांनी ज्या शेतकऱ्यांनी सोलरपंपसाठी पैसे भरले त्या शेतकऱ्यांना सोलरपंप न देता अर्थीक तडजोड करून ईतर लोकांना सोलरपंप देऊन मोठा भ्रष्टाचार केला आहे, सबंधित सोलरपंप वितरीत करनाऱ्या कंपनीच्या एजंट व डिस्टीब्युटर यांची चौकशी करुन त्यांना कठोर शासन करावे तसेच ज्या शेतकऱ्यांनी सोलरपंपसाठी पैसे भरले आणि सोलरपंप लवकर मिळेल या उद्देशाने रब्बी हंगामात पिक पेरा केला त्या शेतकऱ्यांना वेळेवर सोलरपंप न मिळाल्याने शेतकऱ्यांची पिके वाया गेली त्या शेतकऱ्यांना संबंधीत कंपन्यांनी नुकसान भरपाई देऊन तात्काळ सोलरपंप वितरीत करावेत अन्यथा हजारो शेतकऱ्यांसमवेत महावितरण कार्यालयासमोर अमरण उपोषण करू

## लोट, चोरी, घरफोडीतील तीन भावंडांना अंभोरा पोलिसांकडून कडून अटक

आष्टी ।प्रतिनिधी

चोरी घरफोडीसह रस्त्याने जाणाऱ्या लुटणारी त्रिकूट आंभोरा पोलिसांच्या हाती लागली आहेत नगर जिल्ह्यात दहशत निर्माण करणाऱ्या सख्या तीन भावंडांना वर बारा पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत यापैकी शुभम उर्फ चिमण्या मिरदास दास काळे वय( २५ )वैभव मिरदास काळे (वय २६ राहणार पिंपळा तालुका आष्टी जिल्हा बीड )व अन्य एक अल्पवयीन अश्या तिघांचा अंभोरा पोलिसांनी मुश्क्या आवळल्या आष्टी तालुक्यातील आंभोरा पोलीस ठाणे हद्दीत शनिवारी मध्यरात्री बाप्पू मच्छिंद्र लगड यांच्या घरी जबरी चोरी करून सोन्याचांदीच्या दागिन्यास रोख रक्कम असा मोठा ऐवज लंपास केल्याची घटना घडली या प्रकरणी रविवारी दुपारी अज्ञात विरुद्ध गुन्हा दाखल झाला दरम्यान अंभोरा पोलिसांनी गुप्त बातमीदार मार्फत



माहिती मिळतात हद्दीतील पिंपळा गाव गाठले तेथे जबरी चोरी करणारे तीन सख्खे भाऊ आढळून येतात त्यांच्या मुसक्या आवळण्यात आल्या आरोपीवर बीड अहिल्यानगर, जिल्ह्यात बारापेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर, आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हानपुडे, यांच्या मार्गदर्शनाखाली अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे ,पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे ,मनोज कुमार खंडागळे ,बाबुराव तांदळे ,लुईस पवार ,पोलिस अंमलदार शिवदास केदार, सुदाम पोकळे, अमोल शिरसाठ ,सतीश पैठणे,वाहन चालक प्रकाश पडोळे यांनी केली

# आदर्श गुणवंत पुरस्काराने गौरव बीड जिल्हा आंबेडकर भवनात कलाकारांचा उत्साहपूर्ण मेळावा

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मातोश्री जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त, मातृभूमी प्रतिष्ठान आयोजित बीड जिल्ह्यातील नामांकित कलाकारांचा भव्य मेळावा आंबेडकर भवन येथे पार पडला. या प्रसंगी जिल्ह्यातील अनेक प्रतिष्ठित कलाकारांनी हजेरी लावली. कार्यक्रमात, बीड जिल्ह्यातील प्रख्यात कलाकार राजकुमार धुताडमल यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल आदर्श



गुणवंत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या कलाक्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत, हा सन्मान प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प. राधाताई महाराज यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ह.भ.प. मोहन महाराज वरमोट हे होते. या प्रसंगी विविध कलाकार व संयोजकांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आंबेडकर भवनातील कर्मचारी व बीड जिल्ह्यातील विविध कलावंतांचे योगदान मोलाचे ठरले. मेळाव्याची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

# प्रत्येक मातेने राजमाता जिजाऊ सारखे संस्कार देऊन आदर्श नागरिक निर्माण करावे- बोद्धाचार्य साहेबराव किरवले

सिरसाळा।प्रतिनिधी

सम्राट अशोक बुद्ध विहार शिरसाळा या ठिकाणी राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम महापुरुषांना पुष्पाने, दीपाने व धुपाने अभिवादन आयु सोमेश्वर किरवले, आयु बाबासाहेब किरवले, आयु माणिक किरवले, आयु लाला देवकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बौद्धाचार्य साहेबराव किरवले यांनी राजमाता जिजाऊ यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला व प्रत्येक मातेने आपल्या सुपुत्रास माता



जिजाऊ सारखे संस्कार देऊन समाजात आदर्श नागरिक घडवावेत असे मत व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा .दयानंद झिंजुर्डे यांनी केले या कार्यक्रमास बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीचे सर्व सदस्य व बौद्ध उपासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ॲबाकस अवकाशात पांचवा तारा चमकला ऋत्विक गाडेकर !




**शिरूर कासार : येथील रहिवासी तथा जामखेड येथील पोद्दार ईंग्लिश स्कुलमधे शिक्षण घेत असलेला ऋत्विक हरिप्रसाद गाडेकर हा रविवारी झालेल्या ॲबाकसच्या परिक्षेत पांचवा तारा म्हणून चमकला तर त्याला ट्राफी देऊन गौरवीण्यात आले .**

शैक्षणीक क्षेत्रात ॲबाकस हे शैक्षणीक तंत्र झटपट जास्तीत गणीताचे उत्तर कमी वेळात देण्याचे कौशल्य अवगत केले जाते ,पांच मिनिटात ऋत्विकने एकशे सतरा उत्तरे लिहून या क्षेत्रात आपली चमक दाखवली ,त्याची ही पहिलीच वेळ असुन देखील पांचवा क्रमांक मिळवल्याने कौतुकाचा वर्षाव होत आहे .पोद्दारचे प्राचार्य ,पोद्दारचे संचालक ,शिक्षकासह शिरूरमधूनही ऋत्विकचे कौतूक होत आहे .

# लोकशाही पत्रकार संघाच्या उदगीर तालुका महिला आघाडी कार्यकारणीच्या निवडी जाहीर

बीड ।प्रतिनिधी

उदगीर तालुका अध्यक्ष पदी मधुमती कानशेट्टे महिला आघाडी, प्रीती कवटीकवार उपध्यक्ष, संगीता सुतार सचिव, रंजना चितळे कार्याध्यक्ष, रिजवाना शेख यांच्या निवडी भागवत वैद्य सं. अ. लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार ,राष्ट्रीय अध्यक्ष - माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष - संदीप जाधव,राष्ट्रीय कार्याध्यक्ष-मंगला वाघ,प्रदेश कार्याध्यक्ष -अयुब पठाण , प्रदेश उपाध्यक्ष साजेद सय्यद, अनिस कुरेशी - मराठवाडा सचिव, प्रदेश अध्यक्ष महिला आघाडी-निलोफर शेख, मराठवाडा अध्यक्ष - प्रभाकर पांडे, मराठवाडा उपाध्यक्ष- आजाद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हा अध्यक्ष यांनी निवडी जाहिर केल्या. वरील मान्यवर अनेक वर्षापासून सामाजिक,पत्रकारिता क्षेत्रात काम करत आहेत.त्यांनी अनेक सामाजिक संघटनेत




देखील काम केलेले आहे.या त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोकशाही पत्रकार संघाचे नांदेड जिल्हा अध्यक्ष यांनी उदगीर तालुका महिला आघाडी तालुका कार्यकारणी जाहीर केली आहे.त्यांना लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जाधव मुंबई,राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ मुंबई,प्रदेश ,प्रदेशाध्यक्ष महिला आघाडी निलोफर शेख,प्रदेश उपाध्यक्ष रामदास तपसे केज,वसीम आजाद सिल्लोड,प्रभाकर पांडे नांदेड, प्रदेश सचिव हमीद खान जालना, कार्याध्यक्ष आयुब खान पठाण औरंगाबाद,मुंबई प्रदेश अध्यक्ष दत्तात्रय हंडीबाग केज,आत्माराम वाव्हाळ,बिलाल शेख, यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.उदगीर तालुका अध्यक्षपदी मधुमती कानशेट्टे यांची निवड केल्यानंतर संस्थापक अध्यक्ष म्हणाले की,लोकशाही पत्रकार संघ पत्रकारांच्या, महाराष्ट्र मधील तमाम सर्व सामान्य नागरिकांचे देखील विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत.विविध समित्या स्थापन करून उदगीर तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल.विविध कार्यक्रम साजरे केले जातील.एक वेगळा ठसा उमटवण्याचा प्रयत्न तालुकाध्यक्ष मधुमती कानशेट्टे यांच्या माध्यमातून केला जाईल. तालुकाध्यक्ष मधुमती कानशेट्टे म्हणाल्या की,लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून अनेक लोकाभिमुख कार्ये करणार असून लोकशाही पत्रकार संघाचे नावलौकिक वाढवेल.आपण माझे वर जो विश्वास दाखविला आहे. त्याचे सार्थक नक्कीच करीन.अशी खात्री मी देईल.लोकशाही पत्रकार संघाच्या पदाधिकारी या सर्वांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# गेवराईत आजपासून संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या कीर्तन महोत्सवास प्रारंभ

## समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदोरीकरांचे आज कीर्तन
## भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे पदाधिकाऱ्यांचे आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : येथील संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने मंगळवार दि.१४ जानेवारी पासून भव्य कीर्तन महोत्सवास प्रारंभ होत असून यावर्षीचा हा द्वी-दशक भव्य कीर्तन महोत्सव श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ, नगरपरिषद सर्व्हे.नं.६३ च्या सहन जागेवर होणार आहे. महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे. तर समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदोरीकर यांच्या कीर्तनाने भव्य कीर्तन महोत्सवाचा आज प्रारंभ होणार आहे. तरी भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

वै.गुरुवर्य संत भगवानबाबा व वै. संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेवराई येथे संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानतर्फे मागील १९ वर्षांपासून भव्य-दिव्य अशा कीर्तन महोत्सवाचे नियोजनबद्ध आयोजन केले जात आहे. यामध्ये सर्व जाती धर्मातील भाविकांचा लक्षणीय सहभाग असतो. यावर्षीच्या कीर्तन महोत्सवाचा प्रारंभ मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वा.कलश पुजन व सायंकाळी ७ वा.दीपप्रज्वलन करुन ह.भ.प. समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या कीर्तनाने महोत्सवाची सुरुवात होणार आहे. रोज रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तने होणार आहेत. बुधवार दि.१५ रोजी पुणे विद्यापीठचे गोल्ड मेडलिस्ट ह.भ.प.प्रा.डॉ. प्रशांत



महाराज ठाकरे, गुरुवार दि.१६ ह.भ.प. अंकिता ताई घुले, शुक्रवार दि.१७ विनोदाचार्य ह.भ.प.भाऊसाहेब महाराज पन्हाळकर, शनिवार दि.१८ रामायणाचार्य ह.भ.प.उद्धव महाराज चोले, रविवार दि.१९ श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थान, शिरूर (का.) चे मठाधिपती ह.भ.प. स्वामी विवेकानंद शास्त्री, सोमवार दि.२० परभणी येथील ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर शास्त्री, मंगळवार दि.२१ आळंदी येथील विद्यावाचस्पती डॉ.श्री.रविदासजी महाराज शिरसाठ तर बुधवार दि.२२ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत दुर्गाशक्तीगड, भिलवडे चे मठाधिपती ह.भ.प. गणेश महाराज शास्त्री यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल व नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.भव्य कीर्तन महोत्सवात महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, संत महंत तसेच गायक - वादक, टाळकरी हार्मोनियम वादक, विणेकरी, चोपदार आदि गुणीजन वृंद उपस्थित राहणार आहेत.भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे, सचिव तथा जेष्ठ पत्रकार शिवाजी मामा ढाकणे यांच्या सह प्रतिष्ठानच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी केले आहे.




## गट विकास अधिकारी साहेब एक महिन्याच्या कालावधीत तुमच्या अधिकाऱ्यांनी केलं काय ?अधिकारी उपोषण सोडवायला अले होते का भ्रष्ट ग्रामसेवक यांना वाचवायला असा प्रश्न गावकरी यांना पडला आहे ...

रेवली ग्रामपंचायत कार्यालय समोर २ ऑक्टोंबर रोजी ग्रामपंचायत सदस्य सामजिक कार्यकर्ते हिंदुराष्ट्र सेनेचे तालुका प्रमुख विजय बडे हे विविध मागण्या घेऊन आमरण उपोषणास बसले होते पण पंचायत समितीच्या अधिकारी यांच्या लेखी आश्वासन नंतर २ दिवसांनी उपोषण माघार घेतले होते आणि विस्तरक अधिकारी भाताने आणि शेंडगे यांनी लेखी स्वरूपात एक महिन्यात चौकशी करून दोषी अधिकारी यांच्या वर कार्यवाही करू असे सांगितले होते पण अद्याप कुठली ही चौकशी केली नसून सांबधित अधिकारी हे ग्रामसेवक आणि भ्रष्ट लोकांना पाठीशी घालत आहेत असे निदर्शनास येत आहे तरी आपण लवकर चौकशी करून कार्यवाही करावी अन्यथा १५ जानेवारी पासून पुन्हा एकदा आमरण उपोषणाचा इशारा ग्रामपंचायत सदस्य विजय बडे यांनी दिला आहे



**कडा - येथील वरिष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करून शुभेच्छा देतांना संदिप गावडे, शाहिद पठाण, संदिप खेडकर अल्ताब शेख दिसत आहेत.**

# मानेवाडी येथे माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती मोठया उत्साहात साजरी

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मानेवाडी येथे राजमाता जिजाऊ महिला सेवाभावी संस्थेच्या वतीने माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरूवात जिजाऊ वंदना घेऊन करण्यात आली त्यानंतर स्व.संतोष (आण्णा)देशमुख व सोमनाथ सुर्यवंशी यांना श्रध्दाजंली अर्पन करून पुढील कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाच्या




अध्यक्षस्थानी बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीच्या सभापती सौ.सरलाताई मुळे पाटील तर कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्यात्या म्हणुन सौ.माधुरीताई घुमरे (बीड) या होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणुन रोहिणीताई राजेशजी तांगडे (बीड)या होत्या त्यानंतर प्रमुख व्याख्यात्या माधुरीताई घुमरे यांनी जिजांऊची राजनिती व जिजाऊ काय होत्या त्याच बरोबर सावित्रीबाई फुले,माता रमाई,राजमाता अहिल्यादेवी यांची यशोगाथा सर्वासमोर मांडली विद्यार्थीनी दूर्वा दिपक गाढवे हिने जिजाऊच्या वेशभुषेत जिजाऊ विषयी विचार मांडले या कार्यक्रमाचे आभार अविनाश रमेश माने यांनी मांडले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिगांबर तात्या आवारे यांनी केले व स्वामी विवेकानंद यांचे विचार सर्वाना सांगितले शेवटी विद्यार्थिनींनी शिवगीत व राष्ट्रगित घेउन दिगांबर तात्या आवारे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

## जाहिरनामा

प्रकरण : मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नाव नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्या बाबत/नाव लावणयाबाबत/क्षेत्रफळ दुरूस्ती करणेबाबत)

कोर्ट तडजोडपत्र, सात बारा, पी आर कार्ड अधारे, अर्जदाराचे नाव व पत्ता-कोंडोपंत विनायक गुळवेलकर मार्फत. आ.मु. नलीनी कोंडोपंत गुळवेलकर, सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, स.नं.६२ त. गिराम क्षेत्र ४६४.६८ चौ.मी.वर कोंडोपंत विनायक पुळवेलकर मार्फत आ.मु. नलीनी कोंडोपंत गुळवेलकर चे नाव मालमत्ता रजिस्टरला नोंद आहे. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलणयास/नाव लावणयास / क्षेत्रफळ दुरुस्त करण्यास अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल अथवा हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत आक्षेप अर्ज दाखल करणे, मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड**

चर्तुः सिमा- कोर्ट तडजोडपत्र, सात बारा, पी आर कार्ड अधारे

# ज्ञानराधा मल्टीस्टेट ठेवीदार कृती समिती मुख्यमंत्र्याच्या भेटीला

## इतर संचालकाला अटक संचालकाची संपत्ती जमा करून ठेवीदारांना न्याय द्या-राहुल सोनटक्के



ज्ञानराधा मल्टीस्टेट मधील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळणे तसेच संचालक मंडळ यांना तत्काळ अटक करून त्यांची संपत्ती करण्यात यावी यासाठी ज्ञानाचा ठेवीदार कृती समितीने शिर्डी येथे चालू असलेल्या अधिवेश ठिकाणी जाऊन मुख्यमंत्री तसेच विविध विभागाचे मंत्री आमदार यांना भेटून निवेदन देऊन मागणी केली आहे यावेळी कृती समितीचे पदाधिकारी ठेवीदार उपस्थित होते.

महाराष्ट्र मध्ये ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या महाराष्ट्रात एकूण ५२ शाखा असून त्यामध्ये सहा लाख पन्नास हजार ठेवीदाराचे ३७५० कोटी रुपये ठेवी स्वरुपात अडकले असून मल्टीस्टेट चे अध्यक्ष व संचालक मंडळावर एकूण ६२ गुन्हे नोंद आहेत गुन्ह्यात तपास संथ गतीने चालू आहे. मल्टीस्टेट मधून स्वतः हा व्यवसायासाठी व मौजेसाठी ठेवीदारांची रक्कम अध्यक्ष सुरेश ज्ञानोबा कुटे सह इतर संचालक यांनी संगनमत करून अफरातफर करून हडप केली आहे. असा अहवाल ई.डी. (सक्त वसुली संचालनालय) यांच्या मार्फत सादर केले आहे. सदरील प्रकरणी सुरेश कुटे व इतर तीन संचालक यांना अटक केली आहे. उर्वरित संचालक अद्याप पर्यंत फरार आहेत ठेवीदारांच्या ठेवी परत न मिळाल्यामुळे ४५ लोकांनी आत्महत्या केल्या आहेत. शेकडो मुलां-मुलींचे लग्न थांबले आहेत व उच्च शिक्षणापासून वंचित राहून भविष्य अंधकार-मय झाले आहे. ठेवीदारांना न्याय मिळण्यासाठी अर्चना कुटे सह इतर संचालक यांना तात्काळ अटक करून त्यांची संपती जप्त करण्यात यावी. सदरील मल्टीस्टेट चे फोरेन्सिक ऑडीट करण्यासाठी चझखऊ कायद्यानुसार पोलीस अधीक्षक बीड यांना आदेशित करावे. उपजिल्हा निबंधक बीड समृध्द जाधव यांना सदरील मल्टीस्टेटचे ऑडीट करून छउड्ढ कोर्टात सर्व ठेवीदाराच्या वतीने दाखल करण्याचे आदेशित करून ठेवीदाराच्या ठेवी तत्काळ परत मिळण्यासाठी शासन स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेशित करावे. या मागणीचे निवेदन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सह इतर विभागाचे मंत्री आमदार यांना दिले आहे मागणीची दखल तात्काळ घ्यावी नसता येणाऱ्या दिवसात लोकशाही मार्गाने मोठे आंदोलन उभा करू असा इशारा ज्ञानराधा मल्टीस्टेट ठेवीदार कृती समितीने दिला आहे यावेळी कृती समितीचे प्रदेश अध्यक्ष राहुल सोनटक्के,उपाध्यक्ष नानासाहेब गाढे, सचिव डॉ. प्रदीप कात्रजकर सह इतर पदाधिकारी

## बीड जिल्ह्यात बांधकाम कामगार योजनेत दाम दिले की झटक्यात काम ? यामुळे खरे कामगार योजने पासून वंचित विभागीय आयुक्त यांनी विशेष पतकाद्वारे चौकशी करून कारवाई करावी – स्वाती कातखडे

पाटोदा (प्रतिनिधी)



महाराष्ट्र शासनाच्या वतीने इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ मार्फत कामगारासाठी सुरक्षा किट व त्या अंतर्गत विविध योजना राबविण्यात येतात मात्र बीड जिल्ह्यात बांधकाम कामगार योजनेत प्रचंड प्रमाणात महाघोटाळा होत असल्याने विभागीय कामगार आयुक्त यांनी ह्या गंभीर प्रकरणाची विशेष पतकाद्वारे चौकशी लावून खरेखुरे गरजू कामगारांची नोंदणी करून त्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याची मागणी केली आहे. तसे न झाल्यास लोकशाही मार्गाने सावता सेना महिला आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा पत्रकाद्वारे सावता सेना महिला आघाडीच्या बीड जिल्हाध्यक्षा सौ.स्वाती कातखडे यांनी दिला आहे.

## देवणी चे सुपुत्र प्रा. आर .पी .चव्हाण सर यांना बंजारा गोर रत्न पुरस्काराने सन्मानित



देवणी ।लक्ष्मण रणदिवे

क्रिएटिव्ह इंग्लिश अकॅडमी चे संचालक तथा सचिव जीवन ज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था विळेगाव. आर.पी. चव्हाण सर यांना राज्यस्तरीय दिला जाणारा बंजारा गोर रत्न पुरस्कार मिळाला आहे. सेवाभावी संस्थेमार्फत समाजात केल्या जाणाऱ्या कार्याचा आढावा तसेच क्रिएटिव्ह इंग्लिश अकॅडमीच्या मार्फत ग्रामीण भागातील मुला मुलींना इंग्रजी विषयाची असणारी भीती दूर करण्याचा मानस त्यांनी हाती धरल्याचे दिसून येत आहे .त्यांच्या या अनमोल कार्याबद्दल देवणी परिसरातील समाज माध्यमांमध्ये सतत चर्चा घडताना दिसून येत आहे. सदरील पुरस्कार हा राष्ट्रसंत डॉ. रामराव बंजारा विकास फेडरेशन भारत मार्फत समाजात अद्वितीय

## भारत सरकार नोटरीपदी ॲड. राकेश हंबर्डे यांची निवड

आष्टी। ।प्रतिनिधी



दिवाणी व फौजदारी न्यायालय आष्टी येथील प्रसिद्ध ज्येष्ठविधीज्ञ ड राकेश हंबर्डे यांची भारत सर कार नोटरीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना ऑनलाईनद्वारे नोटरी आधिकारी निवड झाल्याचे प्रमाणपत्र देखील मिळाले आहे.केंद्र सरकारच्या वतीने जाहीर क रण्यात आलेल्या यादीनुसार विवि ध ठिकाणचे नोटरी पदे जाहीर करण्यात आली असून यामध्ये आष्टी तालुका वकील संघाचे माजी उपाध्यक्ष तथा नगरपंचायत कायदे विषय सल्लागार ज्येष्ठ विधीज्ञ राकेश हंबर्डे यांचे नाव प्रसिद्ध झाले होते.

त्यानंतर दि.११ जानेवारी २०२५ ऑनलाईनद्वारे नोटरी आधिकारी म्हणून प्रमाणपत्रवाटप करण्यात आले असुन त्यामध्ये २५ वर्षापासुन वकीली करणारे आष्टी न्यायालयातील प्रसिद्ध जेष्ठ विधीज्ञ ड राकेश हंबर्डे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे आ सुरेश धस, माजी साहेबराव दरेकर, किशोर हंबर्डे, आष्टी वकील संघाचे अध्यक्ष ड अजय जेवे, उपाध्यक्ष ड किशोर निकाळजे, सचिव ड यासिर सय्यद, ड अविनाश निंबाळकर,ड आजिनाथ पोकळे,मोहन झांबरे, सरपंच मनोज थोरवे,किरण पोकळे, युवराज मुटकुळे सह अन्य मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे तसेच त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## रुग्णांच्या जीवनात आशावाद निर्माण करणारा ‘आशेच्या कथा ’ हा प्रभावी उपक्रम मुंबई मध्ये आयोजित

मुंबई ।प्रतिनिधी

इंटास फाउंडेशनच्या आपलं घर, चेंबूर, मुंबई येथे आज ‘आशेच्या कथा ’ या प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे रुग्णांना त्यांच्या जीवनातील संघर्ष व आशावादाच्या कहाण्या मांडण्याची संधी मिळाली, ज्यातून सर्व उपस्थितांना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली. या कार्यक्रमासाठी प्रमुख म्हणून अक्षता कांबळे, कल्पेश यमनेरे आणि विशाल लोखंडे उपस्थित होते. त्यांनी रुग्णांशी संवाद साधत, जीवनाच्या कठीण काळात कसे धैर्य आणि संयम राखावे, याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच जीवनातील आव्हानांना कसे सामोरे जावे आणि मानसिक व शारीरिक खंबीरता कशी वाढवावी, याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.ध्यान साधना व स्थिरता यातून ही शांतता मिळणाऱ्या बाबीवर चर्चा झाली.

कार्यक्रमाची सुरुवात रुग्णांनी आपापल्या संघर्षमय अनुभवांच्या कथनाने झाली. अनेक रुग्णांनी कर्करोगाशी झुंज देताना आलेले अनुभव उलगडले. काही रुग्णांनी आपल्या आजारपणाशी केलेल्या लढाईचा प्रवास सांगताना, कुटुंबीयांचा संस्थाचा उभं राहिलेल्या व्यक्तींचा आणि डॉक्टरांचा पाठिंबा त्यांच्या प्रवासात किती महत्त्वाचा होता, हे सांगितले. या प्रेरणादायी कथामुळे इतर रुग्णांमध्येही नवी आशा आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

प्रकल्प सहाय्यक अमित घायाळ यांनी या प्रसंगी आपले विचार मांडले. त्यांनी रुग्णांशी मनमोकळ्या संवादात सांगितले की, रुग्णांच्या चेहऱ्यावरील हसू हीच आमच्यासाठी मोठी प्रेरणा आहे. आमच्या संस्थेमार्फत दिल्या जाणाऱ्या मदतीमुळे रुग्णांना त्यांच्या आजारपणात धैर्याने तोंड देण्याची आणि त्यातून सकारात्मक बदल अनुभवण्याची संधी मिळते. अमित घायाळ यांनी पुढे असेही सांगितले की, इंटास फाउंडेशनच्या मदतीमुळे रुग्णांना मानसिक आधार मिळतो आणि त्यांच्या पुनर्वसन प्रक्रियेला हातभार लागतो.



कार्यक्रमाच्या शेवटी, रुग्णांनी एकमेकांशी संवाद साधून एकमेकांना धीर दिला. ‘आशेच्या कथा ’ या उपक्रमामुळे रुग्णांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि त्यांनी आपले मानसिक व शारीरिक आरोग्य सुधारण्याचा नवा आत्मविश्वास मिळवला.इंटास फाउंडेशनचे आपलं घर दररोज रुग्णांसाठी विविध उपक्रम आयोजित करते, ज्यातून त्यांना मानसिक, शारीरिक व भावनिक आधार मिळतो. ‘आशेच्या कथा ’ हा उपक्रम त्याच पाठिंब्याचा एक भाग आहे, ज्यामुळे रुग्णांना त्यांच्या कठीण प्रवासात धैर्य आणि आशावाद मिळवून देण्यात यश आले आहे.

## शक्तीपीठ महामार्गाचे काम सुरु करावे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई – राज्यातील दळणवळण सुविधा तसेच व्यावसायिक संधी त्याचसोबत पर्यटनाला व्यापक प्रमाणात गती देणा–या शासनाच्या महत्वकांक्षी शक्तीपीठ महामार्गाच्या कामाचे नियोजन सर्वांना विश्वासात घेऊन तत्परतेने सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना आज येथे दिले.**

सह्याद्री अतिथिगृह येथे आगामी शंभर दिवसात सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाच्या कामकाजाचा आढावा मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी घेतला. त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, श्रीमती मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, यांच्यासह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, सचिव सदाशिव साळुंखे, सचिव ए.दशपुते, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व्यवस्थापक अनिल गायकवाड यांच्या सह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी राज्यातील महामार्गाची उभारणी तसेच रस्त्यांचे जाळे दर्जेदार आणि अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने नियोजन करण्याचे सूचित करुन सांगितले की राज्यातील धार्मिक स्थळांना जोडणारा आणि पर्यटन उद्योग व्यवसायाला प्रोत्साहन देणारा शक्तीपीठ महामार्गाची उभारणी ही दर्जेदार आणि गतीमानतेने करावयची असून त्यासाठीच्या प्रक्रीया सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिले.

समृद्धी महामार्गाचे उर्वरित अंतिम टप्प्याचे आमणे पर्यंतचे ७६ कि.मी. लांबीचे काम तत्परतेने पूर्ण करुन फेब्रुवारी पर्यंत हा महामार्ग पूर्णपणे खुला करावा. तसेच यावर्षी समृद्धी महामार्गाचे कर्ज रोखे प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. प्रवाश्यांना उपयुक्त ठरणा–या मुबंई पुणे द्रुतगती मार्गावरील १३.३० कि.मी. मिसिंग लिंकचे काम ही गतीने पूर्णत्वास न्यावे. त्याचप्रमाणे नाशिक मुबंई या महत्वाच्या राष्ट्रीय महामार्गाचे सुधारणा करण्याचे काम ही तातडीने पूर्ण करावे. तसेच मंत्रालय परिसरात नविन सात मजली इमारतीची उभारणी कामाची सुरवात येत्या शंभर दिवसात करण्याचे सूचित केले.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कामांची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी संबंधितांकडून योग्यरित्या पार पाडल्या जाणे आवश्यक असून त्याचे नियंत्रण करणारी यंत्रणा विभागाने कार्यान्वित करावी. विभागाच्या आर्थिक सक्षमतेसाठी नियोजन विभागाच्या निर्देशानुसार आर्थिक प्रारुप तयार करावे. त्याचप्रमाणे रस्त्यांच्या निर्मितीसाठी भूसंपादन प्रक्रिया शासनाने करुन रस्त्याचे काम बीओटी तत्वार करण्याचे धोरण स्विकारावे. विविध विभागांच्या बांधकामां संदर्भात केंद्रीय कार्यपद्धती अंमलात आणणे गरजेचे आहे. त्यासाठी बांधकाम विभागातच संबंधित विभागांच्या बांधकामासाठीचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येईल. रस्त्यांच्या दुर्तफा वृक्ष लागवड करताना भविष्यातील रस्ता विस्तारी करणाची निकड लक्षात घेऊन वृक्षसंगोपन करणात यावे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन दर्जेदार आणि गतिमान कामे करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी संबंधितांना दिले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विभागामार्फत गुणवत्तापूर्ण आणि गतीमानतेने काम करण्यास प्राधान्य देण्यात येणार असून विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि कालमर्यादा प्रामुख्याने पाळण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच महामार्गावर प्रवाश्यांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध असण्यावर प्राधान्याने महिला प्रवाश्यांसाठी प्रसाधन गृहाची सुविधा उपलब्ध करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले.

विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती म्हैसकर यांनी विभागाच्या आगामी शंभर दिवसांच्या नियोजनाबाबत माहिती देताना कार्यक्षमता, गुणवत्ता,पारदर्शकता याला प्राधान्य देत विभागाच्या माध्यमातून येत्या शंभर दिवसांत विविधांगी महत्व पूर्ण प्रकल्प पूर्णत्वास नेण्यात येणार असून विभागाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राबवण्यात येणा–या कामांची सविस्तर माहिती यावेळी दिली.



## सन्मान मागून मिळत नसतो त्यासाठी लायक बनावे लागते – राधाताई सानप

मातृभूमीच्या शिक्षक व गुणवंत पुरस्काराचे थाटात वितरण

बीड : सन्मान हा कोणाला मागून मिळत नसतो त्या सन्मानासाठी लायक बनावे लागते, तसे कर्तुत्व सिद्ध करावी लागते आणि येथील सर्व शिक्षकांनी ते सिद्ध केल्याने पुरस्कारासाठी पात्र ठरले असून ही शाब्बासकीची थाप तुम्हाला कार्य करण्यास नक्कीच प्रेरणा देईल. ज्या क्षेत्रात तुम्ही काम करत आहात त्या क्षेत्राला अजून उंचीवर घेऊन जाण्याचा सल्ला सुप्रसिद्ध कीर्तनकार राधाताई सानप यांनी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व विविध क्षेत्रातील गुणवंतांच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात दिला.

अध्यक्षस्थानी मोहन महाराज खरमाटे होते. वधू वर सूचक मेळाव्याविषयी बोलताना त्या म्हणाल्या की, सद्य परिस्थितीत प्रत्येक मुलीला नोकरदार नवरा मिळणार नाही, तसा हट्ट कश्यासाठी ? पैशाने माणसाची परिस्थिती सुधारते पण मनस्थिती सुधारत नाही.पैसेवाला जोडीदार पाहण्यापेक्षा तुम्हाला समजून घेणारा आणि तुमच्या कार्यात मदत करणारा जोडीदार शोधा. तुमची मनस्थिती उत्तम राहील. प्रत्येक आईनी मुलींना स्वयंपाक शिकवावा व योग्य संस्कार देण्याची गरज असल्याचे सांगून आयोजक डॉ. संजय तांदळे यांचे कौतुक केले.

माजी आमदार उषाताई दराडे, संजय कोठारे, माऊली शिरसाट, रामदास हंगे, इंजि.उत्तम मिसाळ, प्राचार्य डी.जी.तांदळे, किशोर काळे, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर, संपादक वैभव स्वामी, प्रा.दिनकर थोरात, मोहन शिरसाट, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पांडुरंग जायभाये, बाजीराव ढाकणे यांच्या हस्ते जालना जिल्ह्यातील गंगाधर वानोळे यांच्यासह १७ शिक्षक शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आणि इतर १५ विविध क्षेत्रातील गुणवंतांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्त १२ जानेवारी रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे भव्य कार्यक्रमात गंगाधर वानोळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## संम्मेलनास अण्णाभाऊ साठेंच्या नावाची मागणी

### अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष शरदचंद्र पवार यांना मुंबई येथे निवेदन

बीड – दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन परिसरास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे. अशा मागणीचे निवेदन अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष शरदचंद्र पवार यांना मुंबई येथे देण्यात आले.

डेमोक्रॅटिक पार्टीचे अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी हे निवेदन पवार यांना दिले. मराठी भाषेला दर्जा मिळवून देणारे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आहेत. त्यांच्या साहित्याचा योग्य गौरव दिल्लीच्या मराठी साहित्य संमेलनात करावा. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे एकमेव असे लेखक आहेत, ज्यांचे साहित्य देशातील विविध भाषेत प्रसिद्ध झालेले असून त्यांच्या साहित्यातून अनेक शब्दांची निर्मिती झाली आहे.अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून उमटलेले प्रतिबिंब जगाला हेवा वाटावा असेच आहे. त्यामुळे दिल्ली येथे होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन परिसराला साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे असे नाव देण्यात यावे. आशा मागणीचे निवेदन डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी शरद पवार यांना दिले. यावेळी पवार यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा संमेलनात योग्य तो सन्मान केला जाईल. आपल्या मागणीचे पत्र साहित्य मंडळाला वर्ग करून, त्यांना आदेशित करण्यात येईल. असा विश्वास शरदचंद्र पवार यांनी दिला. सदरील निवेदन देताना डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

गेवराई (प्रतिनिधी)

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच रामेश्वर जगताप हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून बेलगाव व बागपिंपळगाव सेवा सोसायटी चेअरमन जनार्धन आप्पा चितळकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीनिवास देवकते, जि.प केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्र प्रमुख नामादेव शिंदे सर, गणेश मुगूटराव, भागवत साकळे, अभिमन्यू ठोंबरे, हैसाबाई कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात शाळेतील ५वी ते १० वी वर्गातील कल्याणी गोरे, श्रध्दा बळवंते, सोनल पडुळे, अश्विनी देवकते, दिपाली माळी, वैशाली देवकते, कल्याणी देवकते, वक्ते, श्रृती



मुगूटराव, अमृता सुरकुंडे, साक्षी कोळेकर, सिध्दी खटावकर, शिवाणी माळी आदी विद्यार्थ्यांदी यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विषयी आपल्या शब्दात आपले विचार केले. तर काही विद्यार्थ्यांनी गिताव्दारे जिजाऊ माँ साहेब यांच्या जिवन कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणाले शिवरायांचं चरीत्र हे फक्त ढाल, तलवारी अन् घोड्यांच्या टापा नाहीत तर सर्वसामान्यांना जिवन जगण्यासाठी सगळ्यात मोठा शिवमंत्र आहे. शिवरायांना घढविणाऱ्या ह्या जिजाऊ माँ साहेब आहेत. त्याच प्रमाणे आपल्या आई वडिल व गुरुजनांकडून चांगले धडे घेऊन हे चांगले विचार आपल्या जीवनात आचरणात आणावे तसेच गेली अनेक वर्षांपासून शेतकरी समृद्ध होत नाही. याची कारण शेतकऱ्यांच्या मुलांनी शोधून काढली पाहिजेत शेतकरी गरीबीतून बाहेर कसा येईल याचा विचार केला पाहिजे. त्याच प्रमाणे स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करून देश कार्य करावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांनी केले. या प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊ यांच्या शोर्य व हुशारी यांच्या बद्दल सांगून स्वामी विवेकानंद यांच्या जिवन चरित्रावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुजा ठोंबरे यांनी केले. तर आभार मुक्ताबाई मोटे यांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, भागवत सोळुंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे, मयुर येवलेकर, नवनाथ घुगे, हरिभाऊ आघाव, वर्षा कांडेकर, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे आदींनी परिश्रम घेतले.

# ‘सावरकर ’ मध्ये ’वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ विद्यापीठ समितीची भेट

बीड /प्रतिनिधी

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी करीता महाराष्ट्र शासनाद्वारे जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आलेली असून बीड जिल्ह्यासाठी अध्यक्ष म्हणून प्रो. विना हुंबे अधिष्ठाता, वाणिज्य शाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड येथे ग्रंथालयास भेट दिली.

भेटीदरम्यान महाविद्यालया द्वारा १ ते १५ जानेवारी या दरम्यान राबवल्या जात असलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा व स्कूल कनेक्ट २.० या उपक्रमाचा आढावा त्यांनी घेतला. यावेळी संबंधित कार्यक्रमाचे महाविद्यालय समितीचे सर्व सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. सुहास मोराळे, ग्रंथपाल प्रो. अनुजा कास्तीकर यांनी महाविद्यालयातील घेतल्या गेलेल्या सर्व उपक्रमाबद्दल विद्यापीठ समितीस अवगत केले.

डॉ. विना हुंबे यांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा व स्कूल कनेक्ट २.० या उपक्रमा संबंधी विद्यार्थ्यांनी अधिकाधिक लाभ घेऊन स्वतःचे व्यक्तिमत्व जोपासावे असावे असे आवाहन करून उपक्रमासाठी महाविद्यालयास शुभेच्छा दिल्या व समाधान व्यक्त केले. प्राचार्य प्रो. सुहास मोराळे यांच्या अध्यक्षीय समारोपात म्हणाले महाविद्यालयाने या दोन्ही उपक्रमांचे भरघोस नियोजन करून ते उत्कृष्ठ पद्धतीने राबवले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो. रूपाली कुलकर्णी यांनी केले तर प्रास्ताविक प्रो. अनुजा कास्तीकर, आभार डॉ. रमेश खंडागळे यांनी व्यक्त केले. उपक्रम यशस्वीतेसाठी श्री. सचिन चौरे आणि बाळासाहेब वाघमारे यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर व प्रो. उत्तम साळवे, सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.



# अँड.शहादेव जानू भंडारे यांची नोटरी साठी निवड



बीड प्रतिनिधी – बीड जिल्हा न्यायालयात परिसरात वकिलीचा व्यवसाय करणारे अँड.शहादेव जानू भंडारे यांना नोटरी करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. अँड.शहादेव जानू भंडारे हे गेल्या १५ वर्षापासून बीड जिल्हा न्यायालय येथे वकिली क्षेत्रात कार्यरत आहे. त्यांना भारत सरकारने नोटरी करण्याचा अधिकार बहाल केला आहे. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून स्वागत व अभिनंदन होत आहे. त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले आहे.

## पिंपळगाव चे सामाजिक कार्यकर्ते अक्षय भैय्या गवळी समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

दिंद्रुड (प्रतिनिधी)

पनवेल येथील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम इंटरनॅशनल महाविद्यालयाने माजलगाव तालुक्यातील पिंपळगाव येथील अक्षय गवळी हे ग्रामपंचायत सदस्य व मानवी हक्क अभियान चे युवा कार्यकर्ते आहेत. यांना समाजभूषण पुरस्काराने शनिवारी सन्मानित केले.ग्रामीण भागातील तरुणाचा हा सन्मान कौतुकास्पद आहे.

पिंपळगाव येथील अक्षय गवळी हे छ.शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विचारधारेला प्रेरित होऊन सर्व समाजाची बांधीलकी जोपासत सामाजिक कार्यात कार्यरत आहेत.तळागाळातील अडल्या नडल्यांची अडचणीला धाऊन जात मदत करतात.समाज उन्नती साठी सदैव तळमळीने काम करतात याच कारणामुळे मुंबई च्या पनवेल येथील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम इंटरनॅशनल महाविद्यालयाने अक्षय गवळी यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले.मला मिळालेल्या सन्मानामुळे माझ्या कार्याला बळ मिळाल्याचे अक्षय



गवळी यांनी माध्यमांना सांगितले आहे.या कार्यक्रमासाठी उपस्थित पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक-अध्यक्ष श्री अंतेश नरसिंग गवळी सर, मानवी हक्क अभियानचे मुंबई प्रदेश अध्यक्ष कैलास भिसे, किशोर सूर्यवंशी (मानवी हक्क अभियान, मुंबई) प्राध्यापक संजय आढागळे अशोक शेजुळे पश्चिम उत्तर मुंबई मानवी हक्क अभियान जिल्हाध्यक्ष ग्रामपंचायत सदस्य पिंपळगाव सह मान्यवर उपस्थित होते.फ

# पुन्हा संकल्प संस्थेच्या पाठीवर कौतुकाची थाप

## स्वामी विवेकानंद युवा गौरव पुरस्काराने संकल्प संस्थेला सन्मानित

वडवणी /प्रतिनिधी

पसायदान सेवा प्रकल्पाच्या वर्धापन दिनानिमित्त तसेच स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून अनाथांचे घर पसायदान सेवा प्रकल्प यांच्यावतीने अतिशय प्रतिष्ठित समजला जाणारा स्वामी विवेकानंद युवा गौरव पुरस्कार सामाजिक क्षेत्रातील श्री दत्ता मामा बारगजे, शांतीवनचे श्री.दीपक काका नागरगोजे, श्री दत्ताजी नलावडे, श्री व सौ विधाते दांपत्य, पत्रकार अशोक खाडे, पसायदानाचे सर्वेसर्वा श्री गोवर्धनजी दराडे रंजनाताई, व इतर मान्यवरांच्या हस्ते संकल्प संस्थेला प्रदान करण्यात आला. यावेळी श्री कैलास भागवत चोले, व सौ. रेखा कैलास चोले यांनी सन्मान स्वीकारून पसायदान सेवा प्रकल्पाचे कर्तज्ञता व्यक्त केली.

यावेळी संकल्प संस्थेविषयी बोलत असताना इन्फंट संस्थेचे सर्वेसर्वा श्री दत्ता मामा बारगजे यांनी अगदी होतकरू व्यक्तींना हा पुरस्कार दिला आहे त्याबद्दल पसायदान प्रकल्पाचे अभिनंदन केले. तसेच दीपक काका नागरगोजे यांनी आजच्या पुरस्कारासंदर्भात बोलत असताना शून्यातून सुरुवात करणाऱ्या व्यक्तींना हा युवा गौरव पुरस्कार देऊन जो सन्मान केला जातोय तो खरच कौतुकास्पद आहे अशा भावना व्यक्त केल्या तर डॉ.दत्ता नलावडे यांनी संकल्प संस्थेच्या सुरुवातीच्या काळापासून मी साक्षीदार असून अथक परिश्रमातून उभा राहिलेली संस्था म्हणजे संकल्प होय असे उद्गार काढून संस्थेचे कौतुक केले.



कार्यक्रमाचे सांगता गझल मुशायर या कार्यक्रमाने करण्यात आली.या सोहळ्यासाठी संकल्प संस्थेचे मार्गदर्शक श्री पंडित चव्हाण सर, श्री प्रकाश शिंदे सर,सौ संध्या शिंदे मॅडम तसेच संकल्प परिवारा वरती प्रेम करणारे मान्यवर उपस्थित होते.

# २ लाख कोटीं; तेल,अगरबत्तीतूनच येणार २० लाख कोटी

यावर्षी, महाकुंभमेळ्यात पर्यटकांसाठी सुमारे १,५०,००० तंबू, ३००० स्वयंपाकघरे, १,४५,००० स्वच्छतागृहं आणि ९९ पार्किंग लॉट आहेत. ४० हजारांहून अधिक पोलिस अधिकारी सुरक्षा आणि गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी तैनात आहेत.

उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये आज सकाळपासून महाकुंभमेळ्याला सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी गंगा, यमुना आणि सरस्वती नदीचा संगम होणाऱ्या संगम येथे ५० लाख भाविकांनी पवित्र स्नान केलं आहे. जगातील सर्वात मोठा मानवजातीचा मेळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, हजारो वर्षांच्या या कुंभमेळ्यात प्रयागराजमध्ये ४० कोटींहून अधिक लोक येण्याची अपेक्षा आहे. विशेष म्हणजे ही संख्या अमेरिका आणि रशियाच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे.

१२ वर्षांनंतर आयोजित करण्यात येणारा हा कार्यक्रम सुमारे ४००० हेक्टरवर उभारण्यात आला आहे. २६ फेब्रुवारीपर्यंत हा महाकुंभमेळा चालणार आहे. यामुळे भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या उत्तर प्रदेशच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. उत्तर प्रदेशने ४५ दिवस चालणाऱ्या या मेगा कार्यक्रमासाठी सुमारे ७ हजार कोटींचं बजेट वाटप केलं आहे.

महाकुंभमेळ्यातून २ लाख कोटींचा महसूल होणार जमा

महाकुंभ २०२५ मुळे उत्तर प्रदेशात तब्बल २ लाख कोटींचा महसूल जमा होण्याची शक्यता आहे. अंदाजानुसार, ४० कोटी भाविकांपैकी प्रत्येकाने सरासरी ५००० रुपये खर्च केले तरी या कार्यक्रमातून २ लाख कोटी रुपये मिळू शकतात.उद्योग अंदाजांचा हवाला देत ख-छड वृत्तसंस्थेने सांगितलं आहे की, प्रति व्यक्ती सरासरी खर्च १० हजारांपर्यंत वाढू शकतो आणि एकूण आर्थिक उत्पन्न ४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकतं. यामुळे नाममात्र आणि वास्तविक जीडीपीमध्ये १ टक्क्यांहून अधिक वाढ होण्याची अपेक्षा आहे.उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी २०१९ मध्ये प्रयागराजच्या अर्ध कुंभमेळ्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेत १.२ लाख कोटी रुपयांचं योगदान दिलं. २०१९ मध्ये झालेल्या अर्ध किंवा अर्ध्या कुंभमेळ्याने सुमारे २४ कोटी भाविकांना आकर्षित केलं होतं. एका चॅनेलला



दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितलं की, यावर्षी ४० कोटी भाविक येण्याची शक्यता आहे. महाकुंभमेळ्यातून २ लाख कोटींची आर्थिक उलाढाल होऊ शकते.आदित्यनाथ यांनी महाकुंभचं वर्णन जगातील सर्वात मोठे तात्पुरते शहर म्हणून केलं आहे, जे कोणत्याही वेळी ५० लाख ते एक कोटी भाविकांना सामावून घेऊ शकते. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (उ-खढ) नुसार, पॅकेज्ड फूड, पाणी, बिस्किटे, ज्यूस आणि जेवण यासह अन्न आणि पेय क्षेत्र एकूण व्यापारात २० हजार कोटींची भर घालण्याचा अंदाज आहे.

तेल, दिवे, गंगाजल, मूर्ती, अगरबत्ती आणि धार्मिक पुस्तके यासारख्या धार्मिक वस्तू आणि अर्पण हे आर्थिक गोष्टींसाठी आणखी एक प्रमुख क्षेत्र आहे, ते अंदाजे २० हजार कोटींचं योगदान देतात.स्थानिक आणि आंतरराज्य सेवा, मालवाहतूक आणि टॅक्सींसह वाहतूक आणि लॉजिस्टिक्सचा वाटा १० हजार कोटी रुपये असण्याची अपेक्षा आहे, तर टूर गाईड, ट्रॅव्हल पॅकेजेस आणि संबंधित उपक्रमांसारख्या पर्यटन सेवांचा वाटा आणखी १० हजार कोटी रुपये असण्याची शक्यता आहे, असे उ-खढ ने म्हटले आहे.तात्पुरती वैद्यकीय शिबिरे, आयुर्वेदिक उत्पादने आणि औषधांमधून ३ हजार कोटींचा महसूल गोळा होईल. तर ई-तिकीटिंग, डिजिटल पेमेंट, वाय-फाय सेवा आणि मोबाइल चार्जिंग स्टेशन यासारख्या क्षेत्रांचा व्यवसाय १ हजार कोटींचा होण्याची अपेक्षा आहे. जाहिराती आणि प्रचारात्मक उपक्रमांसह मनोरंजन आणि माध्यमांचा व्यापार १० हजार कोटी रुपयांचा होण्याची अपेक्षा आहे, असे उ-खढ ने म्हटले आहे.

महाकुंभमेळा २०२५

१२ वर्षांत चार वेळा साजरा केला जाणारा हा कुंभमेळा भारतातील चार पवित्र स्थळांमध्ये पार पडतो. यामध्ये गंगेच्या काठावरील हरिद्वार (उत्तराखंड), शिप्रा नदीकाठी असणारं उज्जैन (मध्य प्रदेश), गोदावरी नदीकाठी वसलेलं नाशिक (महाराष्ट्र) आणि गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या संगमावर प्रयागराज ही ठिकाणं आहेत. प्रत्येक घटना सूर्य, चंद्र आणि गुरूच्या विशिष्ट ज्योतिषीय स्थितींशी जुळते आणि हिंदू धर्मातील सर्वात पवित्र काळ आहे. महिनाभर चालणाऱ्या या कार्यक्रमात लाखो भाविक, यात्रेकरु नदीत डुबकी मारतात. या पवित्र स्नान विधी, ज्यांना शाही स्नान किंवा अमृत स्नान असेही म्हणतात, त्यांच्या आत्म्याला शुद्ध करतात आणि त्यांची पापे धुतात असे मानले जाते.१४ जानेवारी, म्हणजे मकर संक्रांती (पहिले शाही स्नान), २९ जानेवारी – मौनी अमावस्या (दुसरे शाही स्नान), ३ फेब्रुवारी – वसंत पंचमी (तिसरे शाही स्नान), १२ फेब्रुवारी – माघी पौर्णिमा आणि २६ फेब्रुवारी – महाशिवरात्री (अंतिम स्नान) या दिवशी येथे सर्वाधिक गर्दी होण्याची शक्यता आहे.

कशी आहे तयारी?

यावर्षी, महाकुंभमेळ्यात पर्यटकांसाठी सुमारे १,५०,००० तंबू, ३००० स्वयंपाकघरे, १,४५,००० स्वच्छतागृहं आणि ९९ पार्किंग लॉट आहेत. ४० हजारांहून अधिक पोलिस अधिकारी सुरक्षा आणि गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी तैनात आहेत. सतत देखरेख ठेवण्याच्या हेतूने कृत्रिम बुद्धिमत्ता असलेल्या एआय क्षमतेने सुसज्ज पाळत ठेवणारे कॅमेरे देखील बसवण्यात आले आहेत. भारतीय रेल्वेने प्रयागराजला नियमित सेवा देण्याव्यतिरिक्त, भाविकांना घेऊन जाण्यासाठी १०० गाड्या जोडल्या आहेत, ज्या ३३३० फेऱ्या मारतील. केंद्रीय संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या मते, १५ लाखांहून अधिक परदेशी पर्यटक महाकुंभाला भेट देण्याची अपेक्षा आहे. पर्यटन मंत्रालयाने आयुर्वेद, योग आणि पंचकर्म यासारख्या सुविधा देणारे तंबू शहर स्थापन केले आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

# संतोष देशमुख हत्याप्रकरणात मोठं ट्विस्ट; नवीन एसआयटीची स्थापना, कारण काय?

मोठी बातमी समोर येत आहे, बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात आता नव्या एसआयटीची नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनं खळबळ उडाली आहे. राज्यात चांगलंच वातावरण तापलं आहे. या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे, सोबतच न्यायालयीन चौकशी सुरू असून, एसआयटीची स्थापना देखील करण्यात आली होती. मात्र आता या प्रकरणात पुन्हा एकदा नव्यान एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. नव्या एसआयटीमध्ये अनिल गुजर. विजयसिंग जोनवाल, महेश विघ्ने, आनंद शंकर शिंदे, तुळशीराम जगताप, मनोज राजेंद्र वाघ,चंद्रकांत एस काळकुटे, बाळासाहेब देविदास अहंकारे, संतोष भगवानराव गित्ते या पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या एसआयटीचे अध्यक्ष म्हणून बसवराज तेली हेच कायम राहणार आहेत.



नेमकं कारण काय?

समोर आलेल्या माहितीनुसार संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात जी एसआयटी नेमण्यात आली होती, त्या एसआयटीवर संतोष देशमुख यांच्या कुटुंबाकडून आक्षेप घेण्यात आला होता. यातील काही अधिकाऱ्यांचे वाल्मिक कराडशी संबंध आहेत, असा आरोप देशमुख यांच्या कुटुंबाने केला होता.

त्यानंतर आता एसआयटी बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बसवराज तेली हेच नव्या एसआयटीचे अध्यक्ष राहणार आहेत, मात्र यातील काही पोलीस अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.

मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक

संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आठ आरोपींना मोक्का लावण्यात आला आहे, मात्र या प्रकरणात आरोप होऊन देखील वाल्मिक कराड यांच्यावर मोक्का न लावण्यात आल्यानं आज मस्साजोगचे ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले, पाण्याच्या टाकीवर चढून ग्रामस्थांनी आंदोलन केलं. या आंदोलनामध्ये संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख देखील सहभागी झाले होते. वाल्मिक कराडवर मोक्का अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी यावेळी ग्रामस्थांनी केली. या आंदोलनात मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील देखील सहभागी झाले होते, यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार टीका केली, वाल्मिक कराडवर मोक्का का लावला जात नाही असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

# अंबाजोगाईत अतिक्रमण हटाव मोहीम शहरातील रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाईत मुख्य रस्त्यावर दिवसभर मोहीम राबवण्यात आली अतिक्रमण धारकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचा चांगलाच धसका घेतला त्यांची घोषणा झाल्या नंतर तातडीने व्यापारी, छोटे व्यावसायिक आपापले अतिक्रमण काढून घेत असल्याचे दिसून आले.अतिक्रमण मोहिमेत संत भगवान बाबा चौक ते स्वा.रा.ति.शासकीय रुग्णालय रस्ता तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते यशवंतराव चव्हाण चौक रस्ता सावरकर चौक ते पाटील चौक रस्ता आदी भागांतील अतिक्रमणे काढण्यात आली.शहरातील मुख्य रस्ते ह कोट्यावधी रुपयांच्या निधी व्दारे सुसज्ज झाले आहेत नव्या रस्त्यावर असलेले अतिक्रमणे काढण्याची मोहिम नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम खाते यांनी हाती घेतली आहे. प्रशासनाच्या या



कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले असून पुन्हा हे अतिक्रमण ' जैसे थे ' होणार नाहीत याचीही काळजी घ्यावी अशी मागणी केली आहे मागील काही दिवसांपासून लाऊडस्पिकर वरून सूचना दिल्या जात होती नंतर नगर परिषद आणि पाठोपाठ सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली बसस्थानक, तहसिल कार्यालय भाग,नगर परिषद भाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, बस आगार, अण्णाभाऊ साठे चौक,आदी ठिकाणची अतिक्रमणे काही प्रमाणात हटवण्यात आली असून. पुन्हा अतिक्रमण केल्यास गुन्हे दाखल करण्याचा इशारा संबंधित खात्याच्या व विभागाने दिला आहे. त्यामुळे ज्या ठिकाणचे अतिक्रमण हटवले, तेथे पुन्हा अतिक्रमण न होण्याबाबतही सूचना दिल्या गेल्या आहेत

फेरीवाले,भाजीवाले, खाद्यपदार्थ व चहाच्या टपऱ्या, तसेच दुकानांच्या फलकांनी शहरातील रस्ते अडवल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला होता. या कारवाईमुळे शहरातील अनेक रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला कसलाही राजकीय हस्तक्षेप न जुमानता ही कारवाई सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरूच ठेवली असून शहरातील सर्व अतिक्रमणे काढण्यात येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वतीने सांगण्यात आले.

# शेतकऱ्यांसाठी गुडन्यूज ; मुख्यमंत्र्यांची मागणी कृषीमंत्र्यांकडून मान्य

## सोयाबीन खरेदीला ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्यातील सोयाबीन खरेदी सुरुच ठेवण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी परवानगी दिली आहे. महाराष्ट्रातील सोयाबीन खरेदी ३१ जानेवारीपर्यंत वाढवण्याचे केंद्रीय कृषीमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत. यापूर्वी ही खरेदी आजपर्यंत म्हणजे १३ जानेवारी पर्यंत करण्याचे होते निर्देश होते. आता सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्यात आली आहे. आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषीमंत्री चौहान यांना



फोन करतक मदतवाढ देण्याची मागणी केला होती. त्यांच्या या मागणीला यश आलं आहे.

महाराष्ट्र सरकारच्या विनंतीवरुन केंद्र सरकारनं सोयाबीन खरेदीची मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा राज्यातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. अनेक शेतकऱ्यांची सोयाबीन विक्री बाकी आहे. मुदवाढ दिल्यामुळं हमीभावात शेतकऱ्यांच्या सोयाबीनची विक्री करता येणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या विनंतीवरुन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंहे चौहान यांनी हा निर्णय घेतला आहे.

पंतप्रधान मोदींसह कृषीमंत्री चौहान यांचे फडणवीसांनी मानले आभार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ देण्याची मागणी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे केली होती.. त्यांनी कृषीमंत्र्यांशी फोनवरुन चर्चा देखील केली होती. ही मागणी तातडीने कृषीमंत्री चौहान यांनी मान्य करत ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे आमच्या शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळेल असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं आहे. मी देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहानजी


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT